सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ - १ यांचे कार्यालय,**
नवीन प्रशासकीय इमारत ४ था माळा , आर.सी. मार्ग, चेंबुर, मुंबई-४०००७१

दुरध्वनी क्र. ०२२-२५२२९३०३
Email ID-dcpzone6-mum@mahapolice.gov.in
zone6stat@gmail.com

---

**जा.क्र. /पोउआ/पुर्व परि.१/वा/२०२६ दिनांक :- २२/०९/२०२६**

**प्रेस नोट**
( दि. २२/०९/२०२६)
( गोवंडी पोलीस ठाणे )

**कर्तव्यावर असलेल्या महिला पोलीस अंमलदारासोबत गैरवर्तन करणा-या आरोपीस न्यायालयाकडुन शिक्षा**

दिनांक २१/०९/२०२६ रोजी मा. अति सत्र न्यायालय, कोर्ट क्रंमाक ३४, मुंबई यांनी गोवंडी पोलीस ठाणे गु.र.नं. २१६/२०१८ कलम ३५३, ५०९, ३५४(अ), भा.दं.वि. प्रमाणे गुन्ह्यातील आरोपी नामे सरोज दुर्योधन सी, व्यवसाय चालक, रा. ठी. कुकरेजा कंम्पाउंड समोर, टाटा कुटीर तळ मजला, ११ वा रोड, चेंबुर मुंबई यास दोषसिध्दीअंती विविध कलमान्वये शिक्षा सुनावली.

दिनांक २१/०८/२०१८ रोजी फिर्यादी महिला पोलीस अंमलदार ह्या वाहतुक सुरळित करण्याचे कर्तव्य करीत असतांना आरोपी याने फिर्यादी यांना उद्देशुन अश्लील हातवारे करुन तसेच अश्लील शिवीगाळ करुन फिर्यादी यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याने फिर्यादी यांनी गोवंडी पोलीस ठाणेस दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.नं. २१६/२०१८ कलम ३५३, ३५४(अ), ५०९ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. सदर गुन्ह्यात दिनांक २१/०९/२०२६ रोजी मा. अति सत्र न्यायालय, कोर्ट क्रंमाक ३४ मुंबई यांनी आरोपी सरोज दुर्योधन सी यास कलम ३५३ भा.दं.वि. अन्वये ६ महिने कारावास व ५०० रुपये दंड, कलम ३५४(अ) अन्वये ६ महिने कारावास व ५०० रुपये दंड तसेच कलम ५०९ भादंवि अन्वये ६ महिने कारावास व ५०० रुपये दंड तसेच दंड न भरल्यास १ महिने कैदेची अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणामध्ये तपास अधिकारी सपोनि प्रियंका पाटील यांनी केलेला सखोल तपास, शास्त्रीय व प्रभावी तपास, सबळ पुराव्यांचे संकलन व त्याचे योग्य प्रकारे दस्तऐवजीकरण, तसेच सरकारी अभियोक्ता श्रीमती ज्योती सावंत व पैरवी अधिकारी पोउपनि अजय यादव यांनी मा.न्यायालयासमोर प्रभावी सादरीकरण करणे, सदर प्रकरणाचे न्यायालयीन कामकाज पाहणारे अधिकारी यांनी सरकारी पक्षाशी योग्य समन्वय साधणे तसेच सातत्यपुर्व व परिणामकारक पैरवी करणे यामुळे आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयाचा फायदा न देता सिध्द होवुन त्यास मा.न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावली आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. सह पोलीस आयुक्त का. व सु. श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री. धनंजय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त पुर्व परिमंडळ ०१ समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त चेंबुर विभाग रामराव ढिकले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरीनाथ सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दयानंद जाधव, मसपोनि प्रियंका पाटिल, पोउपनि अजय यादव, सपोउपनि भंडवलकर, पोहवा ज्ञानेश्वर राठोड, पोहवा बोराटे, मपोहवा खरात यांनी केली आहे.

***